# भारतातील ज्ञान निर्मितीचा इतिहास

## घटक ३ : मानव्यविद्यांचा विकास

## ब. तत्त्वज्ञान – वैदिक, लोकायत, बौद्ध, जैन

न्याय दर्शनाच्या वात्स्यायन प्रणित भाष्यात तत्त्वज्ञान पदाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. तत् म्हणजे सत् आणि असत् होय. तत्त्व हे भाववाचक नाम आहे. तत् पदापुढे भाव प्रत्यय लागला आहे. सत् चे यथाभूत व अविपरीत स्वरूपातील ज्ञान, तेव्हा त्यास तत्त्व असे म्हणतात. तसेच असत चे यथाभूत आणि अविपरीत अशा स्वरूपातील ज्ञान होते. तेव्हा त्यास तत्त्व असे म्हणतात. असे ज्ञान प्रमाणाने होते. प्रमाणाने होणारा सत् किंवा असत याबद्दलचा निर्णय म्हणजे निश्चयात्म ज्ञान किंवा तत्त्वज्ञान होय.

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये प्रामुख्याने दोन प्रणाली आहेत. नास्तिक आणि आस्तिक तत्त्वज्ञान. जे ईश्वराचे अस्तित्व मानत नाहीत ती नास्तिक तत्त्वज्ञाने आहेत आणि जी ईश्वराचे अस्तित्व मानतात ती आस्तिक तत्त्वज्ञाने आहेत. भारतातील या तत्वज्ञानाचा परिचय पुढीलप्रमाणे

### तत्त्वज्ञानाची नास्तिक प्रणाली

लोकायत तत्त्वज्ञान यालाच चार्वाक तत्त्वज्ञान असेही म्हणतात. हे पूर्णतः भौतिकवादी आहे. चार्वाकांच्या मतानुसार जगाचे एकमेव सत्य भौतिक जग आहे. आत्मा, ईश्वर, किंवा पुनर्जन्म यांचे अस्तित्व मानत नाही. बौद्ध तत्त्वज्ञानाची प्रणाली खूप प्राचीन आहे. महात्मा गौतम बुद्धांच्या पूर्वी कस्सप, ककुसंध, नारद असे सत्तावीस बुद्ध होऊन गेले आहेत. गौतम बुद्ध हे अठ्ठाविसावे बुद्ध होते. बौद्ध परंपरा ही पूर्वीपासून चालत आलेली समण परंपरा होती. समण परंपरा सिंधू संस्कृतीपासून चालत आली होती असे विद्वान मानतात. बौद्ध तत्त्वज्ञानात चार आर्य सत्ये, अष्टांगिक मार्ग यावर जोर दिला जातो. बौद्ध दर्शनाचे मुख्यातः चार प्रकार आहेत. माध्यमिक, योगाचार, सौतांत्रिक आणि वैभाषिक. जैन धर्मही प्राचीन असून तोही समण परंपरेतून तयार झालेला आहे. भगवान महावीरांच्या पूर्वी जैन धर्माचे तेवीस तीर्थंकर होऊन गेलेले आहेत. भगवान महावीर हे चोविसावे तीर्थंकर होते. जैन तत्त्वज्ञान देव व वेद दोन्हीही मानत नाहीत. जैन तत्त्वज्ञानात अहिंसा, अनेकांतवाद, आणि स्यादवाद या तत्त्वांना महत्त्व आहे.

**तत्त्वज्ञानाची आस्तिक प्रणाली (वेदप्रामाण्य मानणारी)**

आस्तिक म्हणजे जे वेदांना आणि देवाना प्रामाण्य मानतात. या प्रकारातील तत्त्वज्ञान वेद, उपनिषदे, गीता आणि स्मृती ग्रंथांना प्रमाण मानतात. आस्तिक प्रणालींचे मुख्य सहा दर्शन यास षडदर्शन असे म्हटले जाते. या षडदर्शन प्रणाली पुढीलप्रमाणे आहेत. न्यायदर्शन: गौतम ऋषींनी प्रतिपादित केलेले न्यायदर्शन तर्कशास्त्रावर आधारित आहे. यामध्ये ज्ञानप्राप्तीची साधने आणि त्याची परीक्षा महत्त्वाची मानली जाते. वैशेषिक दर्शन: कणाद ऋषी यांचे हे दर्शन आहे. यामध्ये जगाच्या घटकांचा परमाणूंचा अभ्यास केला जातो. सांख्य दर्शन - कपिल मुनी यांनी हे दर्शन मांडले. यामध्ये प्रकृती (मूळ पदार्थ) आणि पुरूष (चेतना) या दोन तत्त्वांचे महत्व सांगितले आहे. योगदर्शन - पतंजली ऋषी यांनी योगसूत्राव्दारे हे दर्शन मांडले. यामध्ये ध्यान, योगाभ्यास, आणि मानसिक नियंत्रण यांना महत्त्व दिले आहे. पूर्वमीमांसा जैमिनी ऋषी यांनी प्रतिपादित केलेले दर्शन असून यामध्ये वेदांच्या कर्मकांडांना महत्त्व दिलेले आहे. त्यात धार्मिक विधी महत्त्वाचे मानले जातात. उत्तर मीमांसा (वेदांत) ः वेदांत म्हणजे उपनिषदे. उपनिषदांचे विचार हे शंकराचार्य, रामानुजाचार्य, आणि मध्वाचार्य यांनी मांडलेले आहेत.

याप्रमाणे भारतीय तत्वज्ञानाच्या परंपरा असून त्यांचा परिचय पुढीलप्रमाणे...

# वैदिक तत्त्वज्ञान

## वैदिक तत्वज्ञान म्हणजे काय

वैदिक तत्त्वज्ञान हे वेदांतील विचार, उपदेश, मंत्र, स्तोत्रे, उपनिषदे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यक आणि उपासना यांवर आधारित आहे. हे तत्त्वज्ञान माणसाच्या जीवनाचे अंतिम सत्य, आत्मा, ब्रह्म, मोक्ष, धर्म, कर्म, पुनर्जन्म अशा गूढ विषयांचा शोध घेते.

## वैदिक तत्त्वज्ञानाचे चार प्रमुख स्रोत (वेद साहित्य)

1. संहिता: यामध्ये मंत्रसंग्रहांचा समवेश होतो. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या चार वेदांमध्ये हे मंत्र आहेत.

2. ब्राह्मणग्रंथ: ब्राह्मण ग्रंथांना ब्राह्मणे असेही म्हणतात. ब्राह्मण ग्रंथामध्ये संहिता आणि आरण्यके यामध्ये येतात. या ग्रंथांमध्ये विधी, यज्ञ व कर्मकांड यांचे स्पष्टीकरण देतात. प्रत्येक वेदाचे वेगवेगळे ब्राह्मण ग्रंथ आहेत. ऋग्वेदाचे ऐतरेय ब्राह्मण, यजुर्वेदाचे तैत्तिरिय ब्राह्मण, सामवेदाचे छांदोग्य ब्राह्मण अथर्व वेदाचे गोपद ब्राह्मण ही प्रमुख ब्राह्मणे आहेत.

3. आरण्यके : आरण्यकांमध्ये ध्यान व तात्त्विक चिंतन यांची मांडणी केलेली आहे. चार वेदांचे चार आरण्यक आहेत. ऐतरेय आरण्यक, तैत्तरिय आरण्यक, बृहद् आरण्यक, आणि छांदोग्य आरण्यक हे आरण्यकाचे प्रकार आहेत.

4. उपनिषदे: उपनिषदांमध्ये आत्मा, ब्रह्म, मोक्ष, ज्ञान यांचे तात्त्विक विवेचन केलेलं आहे.

## वैदिक तत्वज्ञान प्रमुख संकल्पना

वैदिक तत्त्वज्ञानातील प्रमुख संकल्पना पुढीलप्रमाणे आहेत.

1. ऋतः म्हणजे नैसर्गिक नियम आणि सार्वत्रिक सत्य होय. सृष्टीतील सर्व गोष्टी विशिष्ट नियमानुसार चालतात. हेच नियम धर्म या संकल्पनेत रूपांतरित झाले.

2. कर्म: कर्म म्हणजे कृती. प्रत्येक कृतीचा परिणाम होतोच. सत्कर्म मोक्षाकडे नेतात, तर दुष्कर्म पुनर्जन्मात अडथळा आणतात.

3. आत्मा: आत्मा म्हणजेच मनुष्याचे खरे स्वरूप. आत्मा अमर, अजर व अविनाशी आहे.

4. ब्रह्म: सर्वत्र असलेले परब्रह्म म्हणे ब्रह्म होय. ब्रह्म हेच अंतिम सत्य समजले गेले आहे. ब्रह्म हे चराचरात भरलेले असून ते अविनाशी आहे असे समजले जाते. ब्रह्म हे निर्गुण निराकार असून ब्रह्म म्हणजेच ईश्वर अशीही मांडणी केली जाते. ब्रह्म हेच सत्य आणि जग मिथ्या आहे. असे मानतात. उपनिषदांमध्ये “अहं ब्रह्मास्मि” ही संकल्पना मांडली आहे.

5. मोक्ष: मोक्ष म्हणजे जन्म-मृत्यूच्या फेर्यातून मुक्ती होय. जीव चौÚयांशी लक्ष योनीतून प्रवास करतो. त्यानंतर त्याला मनुष्याचा जन्म मिळतो. मनुष्याचा जन्म मिळाल्यानंतर त्याने सत्कर्म करून जन्म मृत्यूच्या फेÚयातून मुक्त झाले पाहिजे अशी संकल्पना आहे. आत्मा जेव्हा ब्रह्माशी एकरूप होतो तेव्हा मोक्ष मिळतो.

ब्रह्माचे गुण:ब्रह्म हे तत्त्वज्ञानात सच्चिदानंद स्वरूप मानले जाते.

**उपनिषदांतील तत्त्वज्ञान**

उपनिषद हे वैदिक तत्त्वज्ञानाचे तात्त्विक परमोच्च स्थान आहे. ईशावास्य, कठ, केन, मुंडक, मांडुक्य, बृहदारण्यक, छांदोग्य ही काही प्रसिद्ध उपनिषदे आहेत. ईशावास्य उपनिषदामध्ये ब्रह्म आणि विश्वाचे एकात्म्य विषद करून सांगितले आहे. कठ उपनिषदात यम-नचिकेत संवाद असून आत्मा आणि मृत्यूवर विचार केलेला आहे. बृहदारण्यक उपनिषदात आत्मा, ब्रह्म यांची विस्तृत चर्चा केलेली आहे. छांदोग्य उपनिषदात ‘तत्त्वमसि’ ही प्रसिद्ध संकल्पना स्पष्ट केली आहे.

**वैदिक तत्त्वज्ञानाचा प्रभाव**

वैदिक तत्त्वज्ञानाचा भारतीय समाजावर फार खोलवर प्रभाव पडलेला आहे. भारतीय हिंदू धर्माचे जीवनच वैदिक तत्त्वज्ञान आणि विधींनी व्यापून टाकलेले आहे. वैदिक तत्त्वज्ञानाने योग, ध्यान, ध्यानधारणा पद्धती संस्कृती, साहित्य, धर्मशास्त्र, न्यायशास्त्र या सर्वांवर प्रभाव टाकलेला आहे.

**वर्णधर्म**

वैदिक तत्त्वज्ञानाच्या आचारामध्ये चार वर्ण सांगितलेले आहेत. यजन याजन अध्ययन, अध्यापन हे ब्राम्हणांचे काम म्हटलेले आहे. राजकारण, सत्ता आणि युद्ध हे क्षत्रियांचे कार्य

सांगितले आहे. व्यापार, कृषी, गोरक्षण हे वैश्याचे कार्य सांगितले आहे, तर वरील सर्व वर्णांची सेवा हे शूद्राचे कार्य सांगितले आहे.

**आश्रमधर्म**

आश्रम पद्धती हे ही वैदिक तत्त्वज्ञान आणि आचाराचे अंग आहे. आश्रमांमध्ये ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम असे आहेत. मानवी जीवनाचे १०० वर्षे आयुष्य गृहीत धरून त्याचे २५ वर्षांचे भाग करून पहिली पंचवीस वर्षे ही ब्रह्मचर्याश्रम, पंचवीस ते पन्नास वर्षे गृहस्थाश्रम, पन्नास ते पंचाहत्तर वर्षे वानप्रस्थानाश्रम आणि पंचाहत्तर ते शंभर वर्षे ही संन्यासाश्रम अशी आयुष्याची विभागणी हा आश्रम धर्म करतो. या बरोबर प्रत्येक आश्रमात काय करायचे आहे याचेही दिग्दर्शन करतो.

**निष्कर्ष**

वैदिक तत्त्वज्ञान म्हणजे केवळ धार्मिक कर्मकांड नव्हे, तर जीवनाचे अंतिम सत्य शोधण्याची एक वैज्ञानिक, तात्त्विक व आध्यात्मिक प्रक्रिया आहे. या विचारांवरच पुढील भारतीय तत्त्वज्ञान सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, वेदांत इत्यादी पद्धती उभ्या राहिल्या.

# लोकायत तत्त्वज्ञान

## चार्वाक लोकायत तत्त्वज्ञान म्हणजे काय

चार्वाक तत्त्वज्ञान हे भारतातील एक प्राचीन नास्तिक (अस्तिकेच्या विरुद्ध) तत्त्वज्ञान आहे. याला लोकायत असेही म्हणतात. हे तत्त्वज्ञान भौतिकवादी दृष्टिकोनावर आधारित आहे आणि प्रत्यक्ष अनुभव (इंद्रियज्ञान) हाच ज्ञानाचा खरा स्रोत आहे, असे मानते.

## नावांचा अर्थ

चार्वाक या संप्रदायाचे प्रवर्तक चार्वाक नावाचे एक तत्त्ववेत्ता होते, अशी मान्यता आहे. काही विद्वान चार्वाक या शब्दाचा अर्थ आनंद देणारे वचन असाही घेतात. लोकायत म्हणजे लोक आयत लोकांमध्ये प्रचलित असलेले. म्हणजेच सामान्य लोकांच्या अनुभवावर आधारित विचारप्रणाली.

## चार्वाक तत्त्वज्ञानाची मुख्य वैशिष्ट्ये

प्रत्यक्ष अनुभव चार्वाक मतात फक्त प्रत्यक्ष ज्ञानालाच प्रमाण मानले जाते. अनुमान, उपमान, श्रुती यांना नकार दिलेला आहे. यांचे तत्त्वज्ञान देहात्मवादी आहे. शरीर हाच आत्मा आहे. शरीर नष्ट झाले की आत्मा संपतो, अशी चार्वाक तत्त्वज्ञ्ज्ञनाची धारणा आहे. चार्वाक तत्त्वज्ञाचे नास्तिकता महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आत्मा, परमात्मा, पुनर्जन्म, मोक्ष, वेद हे सगळे चार्वाक नाकारतो

चार्वांकाचे तत्त्वज्ञान भौतिकवादी आहे. जग हे भौतिक घटकांनी बनले आहे. आत्मा किंवा ईश्वर असे काही नाही. त्यांची विचारसरणी सुखवादी विचारसरणी आहे. जेव्हा पर्यंत जगात आहोत, तेव्हा पर्यंत सुख भोगावे हाच धर्म अशी विचारसरणी आहे. याचा अर्थ चार्वाक नैतिकतेचे खंडन करत नाही, पण धार्मिक आधारावर चालणार्या नैतिकतेला मानत नाही. श्रद्धांचा विरोध, यज्ञ, पूजा, तीर्थयात्रा, कर्मकांड ट यांचा विरोध म्हणजे चार्वाकांचे तत्त्वज्ञान आहे.

## चार्वाकांचे प्रसिद्ध वचन

यावज्जीवेत सुखं जीवेत्, ऋणं कृत्वा घृतं पिबेत
भस्मीभूतस्य देहस्य कथ पुनरागमनं कुतः

**अर्थ**

जोपर्यंत जीवंत आहात, तोपर्यंत सुखाने जगा. गरज असेल तर कर्ज काढून सुद्धा तूप प्या. कारण मृत्यूनंतर शरीर राख होते, परत काही येणार नाही.

**चार्वाकांचे तत्त्वज्ञान इतरांपासून वेगळे का आहे**

तत्वज्ञानात आत्मा ईश्वर मोक्ष पुनर्जन्म वेदप्रामाण्य चार्वाक नाकारतो.

**चार्वाक तत्त्वज्ञानावर टीका का**

चार्वाक संप्रदायाला अनेक धार्मिक तत्त्ववेत्त्यांनी टीकेचे धनी बनवले. कारण त्यांनी वेद, यज्ञ, धर्म, ईश्वर, पुनर्जन्म यांचा स्पष्ट विरोध केला. ते सुखवाद आणि भोगवादाचे समर्थन करतात. परंपरागत धार्मिक व्यवस्था याला धोकादायक समजत होती.

**महत्त्व व स्थान**

भारतीय तत्त्वज्ञानात चार्वाक हे एकमेव पूर्णपणे भौतिकवादी विचारसरणी आहे. ही नास्तिक विचारसरणी, वैज्ञानिक दृष्टिकोन या बाबी चार्वाकाच्या प्रभावाखाली आहेत. तर्कशुद्धतेवर विश्वास ठेवणार्या विचारवंतांसाठी चार्वाक आजही महत्त्वाचा आहे.

**निष्कर्ष**

चार्वाक किंवा लोकायत तत्त्वज्ञान हे प्रत्यक्षवाद, भौतिकवाद आणि नास्तिकता यावर आधारित असून ते भारतीय विचारधारेतील विरोधी पण आवश्यक तत्त्वज्ञान आहे. पारंपरिक धर्माची चिकित्सा करून त्यांनी लोकांना विचार करायला भाग पाडले.

# बौद्ध तत्त्वज्ञान

बौद्ध तत्त्वज्ञान म्हणजे गौतम बुद्धांनी प्रतिपादित केलेल्या जीवनदृष्टीचा व तात्त्विक विचारांचा एक संगठित व सुस्पष्ट विचारप्रणाली आहे. याची सुरुवात इ.स.पू. ६व्या शतकात भारतात झाली. हे तत्त्वज्ञान दुःख, त्याची कारणं आणि त्यावर उपाय या मूलभूत मुद्द्यांभोवती केंद्रित आहे. खाली याचे सविस्तर विवेचन केले आहे.

## गौतम बुद्ध परिचय

तथागत गौतम बुद्ध (इ.स.पू. ५६३ ते इ.स.पु. ४८३) हे बौद्ध धर्माचे संस्थापक होते. ते तत्त्वज्ञ, आद्य वैज्ञानिक व थोर समाज सुधारकही होते. बुद्धांचे मुळ नाव सिद्धार्थ होय. शाक्य गणराज्याचा राजा शुद्धोधन व पत्नी महाराणी महामाया (मायादेवी) यांना लुम्बिनी येथे इ.स.पू. ५६३ मध्ये मुलगा झाला. या राजकुमाराचे नाव सिद्धार्थ असे ठेवण्यात आले. सिद्धार्थाच्या जन्मानंतर अवघ्या सातव्या दिवशीच यांची आई महामायाचे निधन झाले. आईचे छत्र हरवलेल्या सिद्धार्थाचा सांभाळ त्यांची मावशी महाप्रजापती गौतमीने केला. त्यामुळे राजकुमार सिद्धार्थाला "गौतम" या नावानेही ओळखले जाते. राजकुमार सिद्धार्थ गौतमास आवश्यक असे सर्व प्रशिक्षण देण्यात आले. यशोधरा या राजकन्येशी सिद्धार्थ गौतमाचा इ.स.पू. ५४७ मध्ये विवाह झाला. त्यांना मुलगा झाला त्याचे नाव राहुल ठेवण्यात आले. पुढे सिद्धार्थ यांनी गृहत्याग केला. ज्ञानप्राप्तीसाठी चिंतन व तपस्या केली. बिहार राज्यातील गया येथे निरंजना नदीच्या काठी पिंपळाच्या वृक्षाखाली धानस्थ बसले असता इ.स.पू.५२८ मध्ये वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी त्यांना दिव्य ज्ञानप्राप्ती झाली. ज्ञानप्राप्तीनंतर सिद्धार्थ गौतमाला सर्वजण बुद्ध असे म्हणू लागले. बुद्ध ही ज्ञानाची अवस्था आहे. बुद्धांना पिंपळाच्या वृक्षाखाली बुद्धत्व प्राप्त झाल्याने त्या वृक्षाला बोधीवृक्ष म्हणतात. बुद्धांनी उत्तर प्रदेश मधील सारनाथ येथे पाच पंडितांना पहिला उपदेश दिला. त्यांच्या पहिल्या उपदेशास "धम्मचक्रप्रवर्तन" किंवा "धम्मचक्कपवत्तन" असे म्हणतात. या प्रवचनात बुद्धांनी बौद्ध धम्माची मूलतत्त्वे सांगितली. त्यात त्यांना अनेक शिष्य लाभले आणि बौद्ध धर्म वाढीस लागला. इ.स.पू. ४८३ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी कुशीनगर येथे तथागत बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले. निर्वाणानंतर जेथे अत्यंसंस्कार झाले तेथे स्तूप उभारलेला आहे.

## बौद्ध धर्माची मूलभूत तत्त्वे

## चार आर्यसत्ये

बुद्धांनी सर्वप्रथम वाराणसीजवळील सारनाथ येथे या सत्यांची शिकवण दिली. त्यात त्यांनी मानवी व्यवहाराच्या मुळाशी चार आर्यसत्ये आहेत असे सांगितले. ती आर्यसत्ये अशी आहेत.

१) दुःख - जीवन दुःखमय आहे. जन्म, मरण, रोग, वृद्धापकाळ, इच्छा अपूर्ण राहणे ही दुःखाची रूपे आहेत.

२) दुःख समुदय - दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे.

३) दुःख निरोध - तृष्णेचा अंत केला तर दुःखाचा नाश होतो.

४) अष्टांगिक मार्ग – दुखाच्या अंतासाठी आठ तत्वाचा अष्टांग (अष्टांगिक) मार्ग सांगितला आहे.

## अष्टांगिक मार्ग

तथागत भगवान बुद्धांनी सारनाथ येथे धम्मचक्र प्रवर्तनाचे विवेचन करतांना नीती व सदाचाराला महत्त्व देऊन मानवाचे जीवन सुखकर होण्यासाठी तसेच निवार्णाच्या समीप पोहोचण्यासाठी अष्टांग मार्ग सांगितला आहे. हा मार्ग मध्यम मार्ग मानला जातो. म्हणजे अत्यधिक भोगही नको आणि कठोर तपही नको असा हा सदाचाराचा अष्टांग मार्ग आहे. अष्टांग मार्ग पालनाने मानवी जीवन सुखमय होते. हा मार्ग पुढीलप्रमाणे

१) सम्यक दृष्टी - योग्य दृष्टीकोन म्हणजे सम्यक दृष्टी होय. निसर्ग नियमाविरुध्द काहीही होऊ शकत नाही.

२) सम्यक संकल्प – सम्यक संकल्प म्हणजे योग्य विचार करणे. योग्य निर्धार करणे होय.

३) सम्यक वाचा - करुणायुक्त व सत्यपूर्ण वाचा ठेवणे व हितकारक बोलणे होय.

४) सम्यक कर्म - उत्तम कर्म म्हणजे योग्य कृत्ये करणे. नीतीमूल्य असलेली कृती करणे होय.

५) सम्यक आजिविका - अहिंसक आणि नैतिक जीवननिर्वाह करणे. वाईट मार्गाने आपली उपजिविका न करता ती सन्मार्गानेच करणे होय.

६) सम्यक व्यायाम - वाईट विचार निर्माण झाल्यास त्याचा त्वरीत नाश करणे. चांगल्या विचारांसाठी व कृतींसाठी प्रयत्न करणे.

७) सम्यक स्मृती – तात्त्विक गोष्टींचे स्मरण करून मनाला जागृत ठेवणे, चांगली कर्मे आणि चांगले विचार याविषयी जागरूकता व सजगता ठेवणे.

८) सम्यक समाधी - कोणत्याही वाईट विकारांना स्पर्श होऊ न देता दुष्ट प्रवृत्तीपासून मन अलग ठेवून चित्त प्रसन्न आणि शांत ठेवणे.

**इतर तत्वे**

अनित्यता - सर्व गोष्टी बदलत्या असतात.
दुःख - सर्व वस्तूंमध्ये काही ना काही दुःख असते.
अनात्म – आत्मा नावाची कोणतीही शाश्वत गोष्ट नाही.
पंचस्कंध – व्यक्ती म्हणजे आत्मा नसून पाच (शरीर, संवेदना, अनुभूती, संस्कार, विज्ञान) घटकांचा समूह आहे.
प्रतित्यसमुत्पाद – सर्व गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत. काहीही स्वतंत्र नाही.
त्रिरत्ने - जीवन जगण्यासाठी शील, समाधी व प्रज्ञा तीन अंग मुख्य आहेत.
निर्वाण – बौद्ध तत्त्वज्ञानातील अंतिम ध्येय निर्वाण आहे.

**बौद्ध तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्ये**

बुद्ध तत्त्वज्ञानात सर्वशक्तिमान ईश्वर मान्य नाही. स्वत अनुभव घेण्याचा आग्रह अंधश्रद्धा न करता तत्त्वांचा स्वत अनुभव घ्यावा. सर्व सजीवांबद्दल करुणारू अहिंसा, करुणा, समता यावर भर दिला जातो. मध्यम मार्ग म्हणजे अति भोग व अति तप यांचा त्याग करणे.

**बौद्ध तत्त्वज्ञानाचे प्रभाव**

सामाजिक समता, स्त्री–पुरुष समानता यावर भर. धार्मिक विधींपेक्षा आचारधर्माला अधिक महत्त्व.बौद्ध धर्मामध्ये विज्ञानवादी व तर्कसंगत दृष्टिकोन आहे.

**बौद्ध धर्माचे योगदान व महत्त्व**

भारतीय इतिहासात बौद्ध धर्माचे फार मोठे योगदान दिलेले आहे. भारतीय समाज व धर्म जीवनात या धर्माने क्रांती घडविली. या देशाच्या सांस्ांतिक विकासातही बौद्ध धर्माची भूमिकामहत्त्वाची ठरली.

कला, साहित्य, विचार प्रणाली, सामाजिक समता, नवीन नीतिमूल्य, या सर्वच अंगाने बौद्ध धर्माने भरीव स्वरूपाची कामगिरी केली.

**१) कर्मकांडाला आव्हान**

उत्तर वैदिक काळात भारतीय धर्म जीवनातकर्मकांडाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला होता. यज्ञयाग, अनुष्ठाने, उपासना,जप तप, पूजाअचा, देवधर्म यासंदर्भात अवडंबर माजले होते. श्रद्धेची जागा अंधश्रद्धेने घेतली होती. मूठभर स्वार्थी लोकांनी आपल्या आर्थिक लाभासाठी कर्मकांड समाजावर लादली होती. या सर्व गोष्टी थोतांड आहेत हे बौद्ध धर्माने लÜकांच्या निदर्शनास आणले. जागृत समाजातून अशा कर्मकांडाला विरोध होऊ लागला.

**२) समतेचा प्रसार**

वैदिक काळातसामाजिक भेदभाव मुळे समाजाचे विघटन झाले होते. सामाजिक विषमता निर्माण झाली होती. ब्राह्मणी वर्चस्वामुळे समाजात अस्वस्थता निर्माण होऊ लागली होती. अशावेळी बौद्ध धर्माने सर्वांना समान लेखले. सर्वांना समानतेची, स्वातंत्र्याची वागणूक दिली. उच्चनीच तेला आव्हान देऊन बौद्ध धर्माने बंधुभावाचा विचार लोकांना समजलेला. धर्माने प्रत्येकाला उन्नती करून घेण्याचा विचार मांडला. त्यामुळे समतेचा प्रसार होण्यास मदत झाली.

**३) स्त्री शूद्रांच्या स्थितीत सुधारणा**

वैदिक धर्माने शूद्रांना सर्व प्रकारच्या हक्क, अधिकार नाकारले. तसेच त्यांनी स्त्रियांनाही ही सुंदरा प्रमाणे दुय्यम स्थानी मानले. त्यामुळे स्त्री शूद्रांच्या वर याकाळात फारच अन्याय होऊ लागले. बौद्ध धर्माने वर्णव्यवस्थेवर आधारलेल्या समाजव्यवस्थेला नाकारले. तसेच त्यांनी समाजधर्म जीवनात स्त्री'पुरुष, उच्च कनिष्ठ या सर्वांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे स्त्री शूद्रांच्या स्थितीत परिवर्तन होण्यास मदत झाली.

**४) शिक्षणाचा प्रसार**

बौद्ध धर्माने धर्म विचारांच्या प्रसारासाठी शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला. त्यामुळे या काळात प्रशिक्षण प्रसाराला चालना मिळाली. त्यांनी या काळात वाङ्मयीन निर्मिती मोठ्या प्रमाणात केली.

बौद्धविहार शिक्षणाची महान केंद्र म्हणून विकसित झाली. यांच्या विद्यापीठा प्रमाणे विस्तार झाला. बिहारमधील नालंदा आणि तक्षशीला व गुजरातमधील वल्लभी ही प्रसिद्ध शैक्षणिक केंद्र म्हणून पुढे आली.

### ५) लोक भाषांचा विकास

बौद्ध धर्मातील वाड्मय पाली या लोकभाषेत लिहिली गेले. गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माचा प्रसार करताना धर्मविचार पाली यालोकभाषेत लिहिली गेले. गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माचा प्रसार करताना धर्मविचार पाली या लोकभाषेत सांगितले. त्यामुळे पाली लोकभाषेचा विकास होण्यास फारच मदत झाली. लोकभाषेत धर्म वाड्मय लिहिण्यास ब्राह्मणांचा विरोध होता. त्याला आव्हान देऊन व धर्माने लोकभाषेचा धर्मप्रसारासाठी केलेला उपयोग एक प्रकारची क्रांतीच होती. शिवाय लोकांच्या भाषेत धर्मविचार मानल्यामुळे ते सहज लोकांपर्यंत पोहोचले.

### ६) साहित्यिक भरभराट

आपल्या धर्माचा प्रसार व्हावा, धर्म विचार लोकांपर्यंत पोहोचावेत यासाठी बौद्ध पंडितांनी मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती केली. मोगलीपुत्र नागसेन, अश्वघोष, नागार्जुन, वसू बंधू, पार्श्व, बुद्ध घोष, आनंद, धम्मपाल, उपाली, वसुमित्र इत्यादी विद्वानांनी अतिशय मौलिक ग्रंथ लेखन केले. त्यामुळे या काळात साहित्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भरभराट झाली.

### ७) कला व स्थापत्य विकास

बौद्ध धर्माचे भारतातील संस्ांती योगदान फार महत्त्वाचे आहे. त्यांनी धर्मप्रसारासाठी स्थापत्य व शिल्पकलेचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला आहे. त्यांनी या काळात बिहार, स्तूप, चैत्य, लेण्या, बुद्धमूर्ती, स्मारके या माध्यमातून कला व स्थापत्य क्षेत्रात आपला ठसा उमटविला जगप्रसिद्ध अजिंठा लेण्या, सारनाथ, सुलतानगंज येथील बुद्धमूर्ती उल्लेखनीय आहे, विद्यापीठाच्या वास्तू, सांचीचा स्तूप, अशोकाचे आलेख, सारनाथ चा अशोकस्तंभ ही सर्व बौद्ध कला व स्थापत्य भारताला मिळालेली मौलिक देण आहे.

### ८) परदेशातही धर्मप्रसार

प्राचीन काळात भारतीय संस्ांतीचा प्रसार जगभरात होण्याच्यादृष्टीने बौद्ध धर्माने केलेले कार्यउल्लेखनीय आहे. परदेशी प्रवासी व राज्यकर्त्यांनी या संदर्भात महत्त्वाचे योगदान दिले. बौद्ध धर्माने भारतीय सीमा पार करून आपले धर्म विचार प्रदेशातही पोहोचविले. श्रीलंका, इजिप्त, चीन, ब्रह्मदेश,

तिबेट, जपान, नेपाळ, कोरिया, सीरिया, जावा, सुमात्रा, कंबोडिया इतर अनेक देशात भारतीय धर्म व संस्कृती रुजविण्यात बौद्ध धर्माचे विशेष योगदान आहे.

**निष्कर्ष**

बौद्ध तत्त्वज्ञान हे एक तर्कसंगत, अनुभवाधारित व नैतिक जीवनशैलीचं मार्गदर्शन आहे. त्यात दुःखापासून मुक्त होण्याचा मार्ग, समता, करुणा, आणि स्वावलंबन यांचा सखोल विचार आहे. हे तत्त्वज्ञान आजही जगभर लाखो लोकांसाठी प्रेरणादायक आहे.

## जैन तत्त्वज्ञान

जैन तत्त्वज्ञान हे भारतातील एक प्राचीन आणि स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. जैन धर्माच्या तत्त्वज्ञानाची मुळे वैदिक परंपरेच्या बाहेर असून, याचे मुख्य प्रणेते महावीर स्वामी (इ.स.पू. ६व्या शतकात) मानले जातात, जे जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर होते.

### वर्धमान महावीर

जैन धर्माचा प्रणिता वर्धमान महावीर यांचा जन्म उत्तर बिहार मधील कुंडग्राम या गावी झाला. त्यांचे वडील सिद्धार्थ हे यात ज्ञातृक जातीचे प्रमुख होते.वर्धमानाच्या आई त्रिशीला ही लिच्छवी गणराज्याच्या चटक राजाची बहिण होती. वर्तमानाच्या पत्नीचे नाव यशोदा होते. वर्धर्मान नाना प्रियदर्शनी नावाची मुलगी होती. क्षत्रिय कुळात जन्मलेल्या वर्तमानाला युद्ध व सर्व शास्त्रांचे प्रशिक्षण दिले होते. घरात ऐश्वर्यसंपन्न वातावरण होते पण विरक्त वृत्तीचा वर्धमानाचे मन घरात रमले नाही. २३व्या वर्षी संसार त्याग करून वर्धमाने संन्यास मार्ग पत्करला. बारा वर्षे तपश्चर्या केल्यावर जभिका गावी ऋजूपालिका नदीच्या तीरावर 'शाल' वृक्षाखाली बेचाळीसाव्या वर्षी वैशाख शुक्ल दशमीस वर्धमान यांना केवलज्ञान प्राप्त झाले. त्यानंतर तीस वर्ष त्यांनी जैन धर्माचा प्रसार केला. वयाच्या ७१ व्या वर्षी बिहार मधील राजगृह जवळील पावा येथे वर्तमानाचे निधन झाले.

### जैन धर्माची शिकवण

महावीरांनी भजन, चिंता, आत्मक्लेष व तपश्चर्या या गोष्टीवर भर देऊन आपले तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहोचविले. मनुष्याच्या आत्म्याचा अंतिम विकास म्हणजे ईश्वरी सत्याचा साक्षात्कार होईल. हे ईश्वरी सत्य उलगडण्याचा प्रयत्न वर्धमान यांनी आपल्या शिकवणीतून केला. त्यातूनच भारतीय भूमीवर उदयास आलेल्या जैन धर्माचे तत्वज्ञान आकाराला आले. धर्माने भारतीय तत्त्वज्ञानात मोठी भर घातली आहे. आगम ग्रंथातून जैन धर्माच्या शीकवणीची व तत्वज्ञानाची माहिती मिळते.

### त्रिरत्न

**१) सम्यक ज्ञान :**

चांगले ज्ञान म्हणजे सम्यक ज्ञान होय. चांगले विचार आत्मसात करावे म्हणजे सम्यक ज्ञान होय.

**२) सम्यक दर्शन**

सम्यक दर्शन म्हणजे वर्धमान महावीर यांच्या विचारांवर सर्वांनी श्रद्धा ठेवावी. त्यांचे अनुकरण करावे.

**३) सम्यक चरित्र**

चरित्र चांगले ठेवावे. चांगले आचरण ठेवावे. त्यासाठी वर्धमान यांच्या शिकवणुकीचा अंगीकार करावा. सम्यक चरित्र घडविण्यासाठी जैन विचारत पाच तत्वे सांगितली आहेत. त्याला पंचतत्व म्हणतात.

**पंचशील तत्व**

सम्यक चरित्रसाठी पाच महत्त्वाची तत्वे आहेत. पंचतत्व धर्मात साधूंना श्रमण व गृहस्थांना श्रावक म्हणतात. या दोघांनाही पंचतत्व अंगीकारण्यास सांगितली आहे. पंचतत्व पुढीलप्रमाणे आहेत.

**१) अहिंसा**

महावीरांची अहिंसेवर खूप श्रद्धा होती. कोणत्याही सजीवाची हिंसा करू नये. व, व्यापक अहिंसा अभिप्रेत धरली आहे. काया, वाचा, मनाने अहिंसेचे पालन करावे.

**२) सत्य**

नेहमी खरे बोलावे. सत्याने वागावे. अगदी विनोद करताना देखील असत्य बोलू नये.

**३) अस्तेय**

अस्तेय म्हणजे माणसाने चोरी करू नये.

**४) अपरिग्रह**

संपत्तीचा कधीही आग्रह धरू नये. आपल्या गरजेपेक्षा मिळालेले धन धर्मासाठी दान करावे.

**५) ब्रह्मचर्य**

विषय उपभोगाचे सेवन न करणे म्हणजेच प्रत्येकाने काया, वाचा, मनाने पालन करावे. या पाचव्या शिलाची मांडणी महावीर यांनी स्वत: केली

**इतर तत्व (शिकवण)**

१) सृष्टीची नित्यता : सृष्टीला आदी अंत नाही. ईश्वर सृष्टीची निर्मिती करत नाही. सृष्टी नित्य आहे.

२) आत्मा : आत्मा नित्य व शुध्द आहे. आत्म्यास सुख दुखाच्या बंधनातून मुक्त होऊन मोक्ष मिळवता येतो.

३) मोक्ष प्राप्ती : सर्व इंद्रियावर विजय मिळवून जीन पदास पोहोचतो त्यालाच मोक्ष प्राप्ती होऊ शकते.

४) मोक्षाचे मार्ग : अहिंसा, त्याग व तपाचरणाद्वारे मोक्ष साधता येतो.

५) कर्म सिद्धांत : आत्मा कर्माच्या बंधनात अडकतो. तपश्चर्या पूर्ण झाल्यावर मनुष्य कर्मबंधनातून मुक्त होतो. कर्मामुळे जन्म मरणाच्या फेऱ्यात माणूस अडकतो. कर्माचा नाश केल्यास मोक्ष मिळतो.

६) अनेकांतवाद : प्रत्येक गोष्टीस अनेक पैलू असतात. एखाद्या गोष्टीचा सात दृष्टीकोनातून विचार करता येतो.

७) नैतिक मूल्य : जैन तत्वज्ञानात सत्य, अहिंसा, क्षमा, करुणा, संयम, त्याग व तप यांना महत्त्व आहे. जगा आणि जगू द्या हे त्यांचे जीवनसूत्र आहे.

**जैन धर्मग्रंथ**

**आगम ग्रंथ** जैनांचे प्राकृत किंवा अर्धमागधी भाषेतील प्राचीन छत्तीस आगम ग्रंथ आहेत.
**तत्त्वार्थसूत्र** आचार्य उमास्वाती यांनी लिहिलेले तत्त्वार्थाधिगम सूत्रम हा संस्कृत ग्रंथ आहे. तो सर्व पंथांना मान्य आहे.

**जैन पंथ**

जैन धर्माचे दोन मुख्य पंथ आहेत. पांढरे वस्त्र घालणारे श्वेतांबर व कठोर तप करणारे तसेच वस्त्र त्याग केलेले दिगम्बर असे दोन पंथ आहेत.

**जैन धर्माचे योगदान व महत्व**

१) सामाजिक योगदान

वैदिक धर्मातील वर्ण व्यवस्थेतील दुष्परिणामांचा आळा घालण्याचा पहिला प्रयत्न जैन धर्माने केला कर्मकांडात गुरफटलेल्या भारतीय समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न ज्यांनी केला. तसेच अहिंसा वादाचा प्रसार करून त्यांनी  शांततावादी  नवा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जैनांनी अहिंसेचे तत्वज्ञान लÜकाभिमुख करून प्रवृत्तीपर केले. त्यामुळे अहिंसा वृत्तीची भारतात वाढ होऊन यथार्थ बली प्रथा मांसाहार इत्यादी अनिष्ट प्रथा ठरल्या.

**२) भाषिक योगदान**

दैनंदिनी आपले लेखन प्रा।त मधून केले. त्यामुळे प्रा।त पाली भाषा समृद्ध होण्यास चालना मिळाली. जैनांनी कन्नड संस्।त भाषेतही आपले ग्रंथ लिहिले आहेत. त्यामुळे भारतीय भाषा समृद्धी मध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची आहे.

**३) साहित्यिक योगदान**

जैन धर्माने भारतीय साहित्य  क्षेत्रातही मÜलाचे योगदान दिले आहे.  जैन धर्मातील प्रमुख ग्रंथांना आगम असे म्हणतात. या ग्रंथात पैकी पहिल्या ग्रंथाची १२ अंगे आहेत. अनेक जैन विचारवंतांनी मौलिक ग्रंथ लिहिले  आहेत.तर्कशास्त्र, व्याकरण, काव्य[1]शास्त्र, शब्दकोश, इतिहास, योग, समाजजीवन  विविध विषयांवर जैन पंडित यांनी लिहिलेले साहित्य भारतीय साहित्य जीवनातील महत्त्वाचा ठेवा.

**४) धार्मिक योगदान**

जैन धर्माचा उदय क्रांतिकारी मांडला जातो. भारतीय धर्म जीवनात परिवर्तन करणारी ही घटना. जैनांचे धार्मिक योगदान म्हणजे त्यांनी भारतीय धर्म जीवनात एक नवीन परंपरा निर्माण केली. त्यांनी शांतता व अहिंसावादी अहिंसावादी धर्मविचार भारतात रुजविण्याचा प्रयत्न. जैन धर्माने धर्मप्रसार करताना अत्यंतिक टोकाची भूमिका कधी घेतली नाही. धार्मिक सहिष्णुता व स्वभावाचे वातावरण भंग होणार नाही याची दखल घेत त्यांनी धर्म विचार मांडले.

**५) कला स्थापत्यात भर**

जैनांचे भारतीय कला स्थापत्यात महत्त्वाचे योगदान आहे. जैन मंदिरे, मूती, गुहा शिल्पे, लेण्या याद्वारे त्यांनी स्थापत्या तील स्वतची जैन शैली निर्माण केली जैनश्रमदान साठी ची गुहा शिल्पे :, ओरिसातील हत्ती गुंफा, वेरूळच्या जैन लेण्या, राजस्थानातील पर्वतावरील जैन मंदिरे, खजुराहोची जैन मंदिरे, तसेच

पावापुर, राजगृह, जोधपुर पारसनाथ येथील मंदिरे, उदयगिरि, खंडगिरी तील लेण्या गिरणार व पाली ठाण्याची मंदिरे, चितोडचा जैन मनोरा, श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराची भव्य मूर्ती या सर्व कला स्थापत्याचे भारताच्या सांस्कृतिक जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

**निष्कर्ष**

जैन तत्त्वज्ञान हे अत्यंत शिस्तबद्ध, अहिंसात्मक आणि नैतिक जीवनशैलीवर भर देणारे आहे. आत्मशुद्धी, संयम, आणि कर्माच्या निर्मूलनाद्वारे मोक्षप्राप्ती हा या तत्त्वज्ञानाचा मुख्य उद्देश आहे.